# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:02.03.2025** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

- कृषिक्षेत्राला देशाच्या विकासाचं पहिलं इंजिन ; सरकारकडून शेतकऱ्यांना मानाचं स्थान : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.

- अंमलीपदार्थांच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या कर्मचाऱ्यांना निलंबनाऐवजी पोलीस सेवेतून बडतर्फ करण्याचा मुख्यमंत्र्याचा इशारा.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत विशेष तपासणी मोहीमेला राज्यभरात सुरुवात.

- ज्येष्ठ लेखिका डॉ. मीना सुधाकर प्रभू यांचं काल पुण्यात निधन.

**आणि**

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आज चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतील शेवटचा साखळी सामना.

**पंतप्रधान**

कृषी क्षेत्राला आणखी लवचिक आणि समृद्ध करणं हा यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा उद्देश असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल कृषी आणि ग्रामीण समृद्धी या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये बोलत होते. कृषिक्षेत्राला देशाच्या विकासाचं पहिलं इंजिन मानून सरकारनं शेतकऱ्यांना मानाचं स्थान दिलं आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. कृषी क्षेत्राचा विकास आणि खेड्यांची समृद्धी या दोन महत्त्वपूर्ण ध्येयांच्या दिशेनं आपण सर्वजण एकत्र वाटचाल करत आहोत, असं त्यांनी सांगितलं. सर्वात कमी कृषी उत्पादन असलेल्या देशातल्या 100 जिल्ह्यांच्या विकासासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजना सरकारनं जाहीर केल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**धनखड**

नालंदा, तक्षशीला विद्यापीठांसारख्या संपन्न विद्याकेंद्रांची देदीप्यमान परंपरा आपल्याला लाभली आहे. ही परंपरा आपण जपली पाहिजे असं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलं आहे. ते काल मुंबईत के.पी.बी हिंदुजा महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी  कार्यक्रमात बोलत होते. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाज परिवर्तन घडविणारे महत्त्वाचे घटक असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्याचे आवाहन धनखड यांनी केले. 'विकसित भारत' हे केवळ स्वप्न नसून निश्चित साध्य असल्याचेही उपराष्ट्रपती धनखड यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री पोलीस**

अंमलीपदार्थांच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं यापुढे केवळ निलंबन न करता पोलीस सेवेतून बडतर्फ केलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत झालेल्या पोलीस संमेलनात बोलत होते. या संमेलनात देशात नव्यानं  तयार झालेल्या तिन्ही कायद्यांच्या अंमलबजावणीचं आणि सायबर प्लॅटफॉर्मचं सादरीकरण करण्यात आलं. तसंच महिलांवरचे अत्याचार रोखण्यासाठी न्यायालयासमोर आरोपपत्र जलद गतीनं वेळेत कसं ठेवता येईल, यावर देखील चर्चा झाली. नवीन कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यात लोकांची जप्त केलेली संपत्ती परत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सहा महिन्यांत लोकांचा मुद्देमाल परत दिला गेला पाहिजे ज्यामुळे पोलिस ठाण्यांची जबाबदारी कमी होईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**बालस्वास्थ्य**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत विशेष तपासणी मोहीमेचा शुभारंभ आणि राज्यस्तरीय मेळाव्याचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पवार म्हणाले. . . .. . .

**आताच्या स्पर्धेच्या युगात ज्या वातावरणात मुलामुलींच्या मनावर खूप ताण येतो अभ्यास आणि इतर कौशल्यात आपला पाल्य मागे राहू नये म्हणून पालक मुलांना मुलींना सातत्याने अभ्यास आणि इतर उपक्रम करण्यात गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे देखील मुलामुलींच्या मनावर ताण येतो आणि काहींनी चुकीचा रस्ता निवडलेला आपल्याला पाहायला मिळतो , अशा प्रकारची वेळ तुमच्या मझ्या महाराष्ट्रात येता कामा नये हा कसोशीन आमच्या राज्य सरकारचा प्रयत्न आहे आपण सर्वांनी मिळून या मोहिमेला संपूर्ण राज्यभर यशस्वी करूया आणि महाराष्ट्रातील प्रत्येक पालकाला सशक्त आणि निरोगी जीवनाची हमी देण्याचं काम करूया .**

याअंतर्गत 6 हजार शाळांमधील 14 लाख विद्यार्थी आणि 30 हजार अंगणवाडीतील 20 लाख बालकांची डोक्यापासून ते नखापर्यंत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे असंही पवार यावेळी म्हणाले.

**नियुक्त्या**
उद्यापासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काँग्रेसकडून विधीमंडळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. विधानसभेच्या मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख तर विधानपरिषदेच्या गटनेतेपदी सतेज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय विधानसभेच्या उपनेतेपदी अमीन पटेल, सचिवपदी विश्वजीत कदम, प्रतोदपदी शिरीषकुमार नाईक आणि संजय मेश्राम यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. विधानपरिषदेत अभिजित वंजारी हे मुख्य प्रतोद असतील तर प्रतोद राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या नियुक्त्या केल्या आहेत.

**मुंडे**
गोसेवा आयोगाच्या पाठीशी शासन खंबीर पणे उभं असून महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे गोसंवर्धन आणि गोसंरक्षणाचे कार्य उत्तम असुन त्यासाठी शासनातर्फे सहकार्य करण्यात येईल. असं प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलं आहे. त्या काल पुण्यात गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभागामार्फत आयोजित अधिवक्ता कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.

**माधुरी मिसाळ**
राज्य परिवहन महामंडळात आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करणार असल्याची माहिती परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली आहे. स्वारगेट बस स्थानकात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने महिलांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काल घेण्यात आलेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. महिला सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना केल्या जाणार असून या प्रकरणामध्ये दोषींवर कठोर कारवाई करणार असल्याचे मिसाळ यांनी यावेळी सांगितलं.

**पाणी**
धाराशिव जिल्ह्यात चालू वर्षातील संभाव्य पाणी आणि चारा टंचाईवर मात करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून काम करावे असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत. नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत पुजार बोलत होते. पाण्याशी संबंधित असलेल्या यंत्रणांनी त्यांच्याशी संबंधित असलेल्या पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनादेखील त्यांनी यावेळी देण्यात आल्या.

**शेती**
कृषिचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात कृषी पदवीधरांनी उद्योजक बनावे आणि शेती क्षेत्राला नवी दिशा द्यावी असे प्रतिपादन अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले आहे. ते काल राहुरी इथल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठात राष्ट्रीय

परिसंवादात बोलत होते. देशभरातील 600 पेक्षा जास्त शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.

**सूर्यघर**

वीज महावितरण कंपनीने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचं राज्य सरकारने दिलेलं उद्दीष्ट 82 दिवसांत पूर्ण केलं आहे. महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ही माहिती दिली. गेल्या शंभर दिवसांच्या मोहिमेत 82 दिवसांत 57 हजार 33 घरांवर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसवण्यात आले. राज्यातल्या लाभार्थी कुटुंबांच्या खात्यात एकंदर 800 कोटी रुपयांचं अनुदान जमा करण्यात आलं आहे. याअंतर्गत लाभार्थी संख्येत छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात चौथ्या, नागपूर पहिल्या, पुणे दुसऱ्या, तर जळगाव जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**पुरस्कार**

समाजासाठी आवश्यक प्रत्येक काम करणे हे समाजाचेच दायित्व आहे असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपालजी यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'तर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान समारंभात डॉ. कृष्णगोपालजी बोलत होते. राजस्थानमधील कोटा जिल्ह्यातील 'गोयल ग्रामीण विकास संस्थान' आणि भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**निधन**

ज्येष्ठ लेखिका,  प्रवासवर्णनकार  डॉ. मीना प्रभू यांचं काल पुण्यात निधन झालं. त्या 85 वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांची प्रवास वर्णन असलेली पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला होता. प्रवास वर्णनांवरील त्यांचे लेख विविध वृत्तपत्रे, मासिकांमध्ये प्रकाशित झाले होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी प्रभू यांच्या निधनाबद्दल आपल्या भावना आकाशवाणीकडे व्यक्त केल्या. ते म्हणाले. . . . .

**जेष्ठ लेखिका डॉ. मीना प्रभू यांच्या दुखत निधनाची बातमी समजली आणि धक्का बसला डॉ . मीना प्रभू यांनी वैदकीय व्यवसाय निष्ठेने करत असताना जगभर भ्रमंती केली आणि त्यांच्या नजरेतून त्यांना जे जग दिसलं.  ते त्यांनी मराठी वाचकांना दाखवलं अनेकदा वाचक भेटल्यावर सांगत असत की आम्हाला पदेशात जाणं शक्य नाही पण  मीना प्रभू यांच्या लेखनातून हे जग आम्ही समजून घेतो अशा जगभर फिरलेल्या जग जवळून पाहिलेल्या आणि स्वतः जे पाहिलं ते मराठी वाचकांना आपल्या लेखणीतून त्याचं दर्शन घडवणाऱ्या डॉ मीना प्रभू यांचं जाणं हे मराठी वाचकांसाठी खूप दुखदायक आहे.**

“ माझं लंडन “ हे त्यांचे पहिले प्रवास वर्णन पुस्तक होते. जगातील निरनिराळ्या ठिकाणांची ज्ञान देणारी रंजक माहिती त्यांनी दिली. इजिप्तायान, तुर्कनामा , ग्रीकांजली, चिनी माती अशी त्यांची अनेक पुस्तके लोकप्रिय झाली. गोवा इथं झालेल्या  महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होत. तसेच त्यांना दि .बा . मोकाशी पारितोषिक, गो.नी.दांडेकर स्मृती पुरस्कार, न.चिं.केळकर पुरस्कार , महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार आदि पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं होतं.

**साठे निधन**

ज्येष्ठ पत्रकार निलांबर साठे यांचे काल पुण्यात  निधन झाले. त्यांनी अनेक वर्ष ‘साप्ताहिक सकाळ’मध्ये काम केले होते. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**क्रिकेट**

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यात दुबई इथं शेवटचा साखळी सामना होणार आहे. दोन्ही संघ उपांत्यफेरीत यापूर्वीच पोहोचले आहेत. काल झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा 7 गडी राखून पराभव केला.भारताने आजचा सामना जिंकल्यास उपांत्यफेरीत भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळावे लागणार आहे.

**हवामान**

आज संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**